www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Civil Services (Main)
Examination, 2026

**KVMS-U-MRTH**

# मराठी / MARATHI

## प्रश्न-पत्र I / Paper I

## (साहित्य) / (LITERATURE)

| | |
|---|---|
| वेळ : **तीन** तास | कमाल अंक : **250** |
| *Time Allowed : **Three** Hours* | *Maximum Marks : **250*** |

---

### प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

***उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी कृपया पुढील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात :***

***आठ*** *प्रश्नांची विभागणी* ***दोन भागांमध्ये*** *केलेली आहे.*

*उमेदवाराला एकूण* ***पाच*** *प्रश्न सोडवावयाचे आहेत.*

*प्रश्न क्रमांक* ***1*** *आणि* ***5*** *हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी* ***तीन*** *प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान* ***एक*** *तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.*

*प्रश्न / भागाने घेतलेल्या गुणांची संख्या त्याच्या विरुद्ध दर्शविली जाते.*

***मराठीतच*** *उत्तरे लिहावीत.*

*ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, तिचे कटाक्षाने पालन करावे.*

*प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न अनुक्रमानेच गृहीत धरले जातील. एखाद्या प्रश्नाचा अंश जरी सोडविलेला असेल, तरी जर तो खोडलेला नसेल तर गृहीत धरला जाईल. कोणतेही पृष्ठ अथवा पृष्ठाचा काही भाग प्रश्नोत्तरपुस्तिकेत कोरा सोडला असेल, तर त्यावर काट मारावी.*

### QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

***Please read each of the following instructions carefully before attempting questions :***

*There are **EIGHT** questions divided in **TWO SECTIONS.***

*Candidate has to attempt **FIVE** questions in all.*

*Questions no. **1** and **5** are compulsory and out of the remaining, **THREE** are to be attempted choosing at least **ONE** question from each section.*

*The number of marks carried by a question / part is indicated against it.*

*Answers must be written in **MARATHI**.*

*Word limit in questions, wherever specified, should be adhered to.*

*Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.*

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

## SECTION A

**Q1. पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशेपन्नास (150) शब्दांत लिहा :** *10×5=50*

(a) विभक्ती म्हणजे काय ते सांगून विभक्ती प्रत्ययांची चर्चा करा. *10*

(b) मराठी प्रदेशानुसार बदलत्या प्रमाणभाषेचे स्वरूप स्पष्ट करा. *10*

(c) प्रयोग म्हणजे काय ? भावे प्रयोगाचे सोदाहरण विवेचन करा. *10*

(d) लोकनाट्याची वैशिष्ट्ये सांगून ‘दशावतार’ आणि ‘खडी गंमत’ या लोकनाट्य प्रकारांचा परिचय करून द्या. *10*

(e) ‘मराठी भाषेचे अस्सल स्वरूप यादवकाळात पाहावयास मिळते.’ या विधानाची सोदाहरण चर्चा करा. *10*

**Q2. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

(a) भाषेच्या विविध व्याख्या सांगून भाषिक संप्रेषणाचे स्वरूप उलगडून दाखवा. *20*

(b) बोली अभ्यासाचे महत्त्व विशद करून अहिराणी बोलीचे स्वरूप-विशेष स्पष्ट करा. *15*

(c) लोकगीतांची संकल्पना स्पष्ट करून त्यातील वाङ्मयीन गुण-वैशिष्ट्यांचा परिचय करून द्या. *15*

**Q3. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

(a) भाषेचे स्वरूप स्पष्ट करून भाषेची विविध लक्षणे सांगा. *20*

(b) शब्दांच्या जाती किती व कोणत्या ते सांगून त्यांची सोदाहरण चर्चा करा. *15*

(c) लोककथा अभ्यासाच्या विविध संप्रदायांचा परिचय करून द्या. *15*

**Q4. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

(a) सतराव्या शतकातील मराठी भाषेंचे स्वरूप सोदाहरण स्पष्ट करा. *20*

(b) बोली निर्मितीची कारणे सांगून वऱ्हाडी ही मराठीची बोली की स्वतंत्र भाषा, ते सोदाहरण स्पष्ट करा. *15*

(c) ‘व्यावहारिक भाषा’ आणि ‘साहित्याची भाषा’ यांतील फरक विशद करा. *15*

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

## SECTION B

**Q5.** **पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशेपन्नास (150) शब्दांत लिहा :** *10×5=50*

(a) 'धवळे' म्हणजे काय ते सांगून महदंबेच्या धवळयांचे स्वरूप स्पष्ट करा. *10*

(b) संत तुकारामांच्या अभंगांची अवतरणक्षमता सिद्ध करा. *10*

(c) आस्वादक समीक्षेचे स्वरूप स्पष्ट करा. *10*

(d) 'पोवाडा' या रचनाप्रकाराचा परिचय करून द्या. *10*

(e) दलित आत्मकथनांचे निराळेपण विशद करा. *10*

**Q6.** **पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

(a) महानुभाव संप्रदायातील चरित्रग्रंथांचा मागोवा घ्या. *20*

(b) संत एकनाथांच्या भारूडातील रूपकात्मकता स्पष्ट करा. *15*

(c) पंडिती काव्य परंपरेतील रघुनाथ पंडिताचे स्थान अधोरेखित करा. *15*

**Q7.** **पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

(a) लावणी या रचना प्रकाराची संकल्पना स्पष्ट करून लावणीच्या विविध अंगांचा परिचय करून द्या. *20*

(b) साहित्य समीक्षा ही साहित्याच्या आकलनास कशी प्रेरक ठरते, ते सविस्तर वर्णन करा. *15*

(c) बखर म्हणजे काय ते सांगून सभासदाच्या बखरीची वैशिष्ट्ये सांगा. *15*

**Q8.** **पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

(a) स्त्रीवादाची संकल्पना स्पष्ट करून स्त्रीवादी साहित्य समीक्षेचा सांगोपांग परिचय करून द्या. *20*

(b) १८५० ते १९९० या कालखंडातील मराठी साहित्य क्षेत्रात झालेल्या बदलांचा ऊहापोह करा. *15*

(c) ग्रामीण साहित्य निर्मितीच्या प्रेरणा सांगून ग्रामीण साहित्यातील बदलते समाजवास्तव विशद करा. *15*